**वि.ल. शिंत्रे कथास्पर्धा**

**तृतीय क्रमांक**

# श्यामची मंगळ सहल

**राघवेंद्र श्रीकृष्ण वंजारी**

अंतराळयान मंगळ ग्रहावर उतरले. त्यातून छोटीशी गाडी बाहेर आली. काचेतून लाल दृश्य दिसू लागले.

''कशी वाटली ही जागा?'' उन्हाळ्याच्या सुट्टीत आजोबा श्यामला मंगळ ग्रहावर सहलीला घेऊन आले होते.

''भन्नाट!'' श्याम उत्तरला.

''आज जायंट क्रेटर बघूया. ते खूप मोठे विवर आहे. कोट्यवधी वर्षांपूर्वी एक मोठा धूमकेतू मंगळावर आदळला. त्यामुळे मोठा खड्डा झाला.'' आजोबांनी सांगितलं.

''वाव! आपल्याला त्याच्या आतमध्ये जाता येईल का?'' श्यामने कुतूहलाने विचारलं.

''जाता येईल, पण पुन्हा वर येता येणार नाही.'' आजोबांनी मिश्किलपणे उत्तर दिले.

यावर दोघेही हसले.

''कसं काय?''

''ते दहा किलोमीटर खोल आहे. त्याला पायऱ्या नाहीत.'' आबांनी समजावलं.

''चल, सूट घालून चालायला लागू.'' दोघेही बाहेर पडले.

''आपण सूर्याच्या विरुद्ध दिशेने चालूया. मला विवराचे



छान फोटो घेता येतील.''

''ते अंतर दूर होईल. तू तरुण आहेस, चालशीलही. या म्हाताऱ्या आजोबाला एवढं चालणं होईल का?'' आबांनी अडचण मांडली.

''आबा, यू आर सुपरमॅन. पृथ्वीवरून इथपर्यंत आलात. इतकं चाला ना हो, प्लीज.'' श्यामने आग्रह केला.

''ठीक आहे.''

दोघेही विवराजवळ पोहोचले.

''धिस इज अमेझिंग!'' विवर पाहून श्याम उद्गारला.

''खूपच मोठं आहे हे! धुळीमुळे पलीकडचा काठ दिसेना.''

''तुमच्या हेल्मेटवर धूळ जमली आहे.''

''अरेच्चा!'' आजोबा दचकून म्हणाले आणि त्यांनी हेल्मेटची काच पुसली.

''आजच्या कॅलेंडरप्रमाणे, ३१ मार्च २२२३ मंगळाचा चंद्र फोबोस पश्चिम दिशेला सायंकाळी ६.४० वाजता दिसेल.'' आजोबांनी घड्याळ पाहत सांगितलं.

दोघेही पुढे निघाले.

माती भुसभुशीत होती. एका ठिकाणाहून विवर निहारू लागले. साडेसहा वाजून गेले.

फोबोस उगवला.

''खूप सुंदर दिसतंय!'' म्हणत श्यामने ते दृश्य कॅमेऱ्यात टिपले.

''होय. पण आपल्या चंद्रासारखा नाही. तो छान वाटतो.''

श्यामला अचानक घडघड घडघड असा अस्पष्ट आवाज आला.

कॅमेऱ्यात फोटो तपासत आजोबांकडे मान वळवतो तर काय, आजोबा दिसेनात.

''आबाऽऽ... आबाऽऽ...'' श्यामने हाक दिली. आजूबाजूला पाहिलं.

विवराच्या दिशेने आजोबा खाली घरंगळून जाताना दिसले.

''आबाऽऽ...'' श्याम ओरडला. त्याला काहीच सुचेना. पुढे उतार, मागे दरी. तो गोंधळला.

आजोबा विवराच्या उतारावर जाऊन पडले.

''माझा आवाज येतोय का?'' श्यामने विचारलं.

धुळीमुळे अस्पष्ट दिसू लागले. आजोबा गाडीकडे जात होते.

''थांबा!''

आबा न बोलता हातवारे करत होते. आजोबा थांबले. तितक्यात श्याम जवळ पोहोचला.

''आबा, तुम्ही बोलत का नाही?''

आजोबांच्या सूटची ऑक्सिजनची नळी तुटली होती.

श्वास घेण्यास त्रास होत होता.

‘‘ओह माय गॉड.’’ श्याम खूपच घाबरला.

आबांनी गाडीकडे जाण्याचा इशारा केला.

‘‘आबा, गाडी सतरा सेकंद दूर आहे. चला.’’

‘‘कम ऑन. यू आर सुपर मॅन.’’ श्यामने त्यांचा आत्मविश्वास वाढवला.

श्याम हात धरून चालू लागला. ते थकले. त्यांना प्राणवायूची गरज होती.

‘‘आबा! आपण गाडीजवळ आलोय.’’ श्याम ओरडला.

त्यांना धीर आला. ते गाडीत बसले. गाडीत ऑक्सिजन असल्यामुळे आबा सुखावले. श्यामच्या जीवात जीव आला.

‘‘आबा...’’ श्याम सतत हाक मारत होता.

आजोबांनी डोळे उघडून ‘‘श्याम...’’ असे उद्गार काढले.

‘‘यू डिड इट,’’ श्याम म्हणाला.

‘‘मी नाही, तू केलंस. तू धाडसी आहेस. खरा सुपर मॅन तू आहेस.’’

‘‘आबा’’, श्यामने आजोबांना मिठी मारली.

‘‘तुम्ही कसे पडलात? मला कळलंच नाही.’’

‘‘मी जमिनीकडे न पाहताच मागे सरकलो आणि तोल गेला, तसाच लोटांगण घेत खाली पडलो.’’

‘‘ही सहल कधीच विसरू शकणार नाही.’’ श्याम म्हणाला.

‘‘चला, परत निघूया निळ्या ग्रहाकडे.’’ आजोबा म्हणाले.

‘‘ओके, लेट्स गो!’’

दोघे पृथ्वीकडे निघाले.

*चित्र –कु. श्रेया पाटील*